गुरुवार, दि. ३ एप्रिल २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २४० वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जवेश्ननृता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# पोलीस ठाण्याच्या आवारातच पोलीसाची पत्रकाराला धमकी

## तालुका पोलीस ठाण्यात तक्रार; पत्रकार संरक्षण कायद्याबाबत ठाण्याचे पोलीस अधिकारी अनभिज्ञ!

**जालना । प्रतिनिधी** - पोलीस ठाण्याच्या आवारातच एका पत्रकाराला बुधवार (दि २) रोजी धमकी दिल्याची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. महत्त्वाचे म्हणजे संबंधीत पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनाच पत्रकार संरक्षण कायद्याबाबत माहिती नसल्याचे दिसून आले असून याबाबत वरिष्ठांना तक्रार पाठवून त्यांच्याकडून याबाबत पत्रकार संरक्षण कायद्याबाबत माहिती घेऊन गुन्हा दाखल करण्यात येईल असे आश्वासन ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री उनवणे यांनी पत्रकारांच्या शिष्टमंडळाला दिले आहे.

या संदर्भात दिलेल्या तक्रारीत जलजला टाईमचे संपादक आमेर खान याकुब खान याने म्हटले आहे की, त्यांच्या वृत्तपत्रात दि ३१ मार्च २०२५ रोजी बातमी लावल्याचा राग मनात धरून पोलीस कर्मचारी चंद्रकांत माळी यांनी जालना तालुका पोलीस ठाण्याच्या आवारात त्यांना बुधवार (दि २) रोजी धमकी देत चेतावले आहे. श्री माळी म्हणाले की, खेटायचे असेल तर मी पूर्णपणे आता खेटतोच




व तुला बघुन घेतो असे म्हणून त्यांनी आमेर खान याचे फोटो काढले. चंद्रकांत माळी यांचे वाळुमाफीयांशी हितसंबंध आहे. त्यामुळे श्री माळी यांच्याकडून व त्यांच्या हितचिंतकांकडून आमेर खान यांच्या जीवितास धोका निर्माण झालेला असल्याचे तक्रारीत नमूद असून पोलीस अधिकाऱ्यांनी वेळीच या बाबीकडे गांभीर्याने लक्ष घालून पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत योग्य ती कारवाई करण्यात यावी.

यासंदर्भात पोलीस निरीक्षक श्री उनवणे यांना पत्रकारांचे शिष्टमंडळ भेटले. त्यांनी विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने चंद्रकांत माळी यांना बोलावून घेऊन नेमके प्रकरण काय ते त्यांच्याकडून जाणून घेतले. पत्रकारांच्या शिष्टमंडळासमोर श्री माळी यांनी घटनाक्रम सांगत एक प्रकारे धमकी दिल्याची कबुलीच दिली. त्यामुळे पोलीस निरीक्षक श्री उनवणे यांनी तक्रार दाखल करण्यास सांगितले. तक्रार दिल्यानंतर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रियेदरम्यान पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांना पत्रकार संरक्षण कायद्याची माहितीच नसल्याने त्यांनी पोलीस निरीक्षकांना याबाबत विचारले असता त्यांना देखील याबाबत विचारले असता ते देखील अनिभिज्ञ असल्याने त्यांनी तक्रार द्या, वरिष्ठांना तक्रार पाठवून त्यांच्याकडून कोणता गुन्हा दाखल करायचा याबाबत जाणून घेऊन येत्या दोन दिवसात गुन्हा दाखल करण्याचे आश्वासन दिले.

पोलीसांनी आश्वासन दिले असले तरी या बाबीचे गांभीर्य पोलीसांनी लक्षात घेऊन लवकरात लवकर निर्णय घेऊन गुन्हा दाखल करावा अन्यथा पत्रकारांच्यावतीने लोकशाही मार्गाने ईशाराही आंदोलनाचा पत्रकारांच्या वेगवेगळ्या संघटनेच्यावतीने देण्यात आला आहे.

### काही पत्रकारांच्या भुमिकेमुळे पत्रकारांत नाराजी

तालुका पोलीस ठाण्याच्या आवारात पोलीस कर्मचाऱ्यांकडून पत्रकारांस दिलेल्या धमकीनंतर पोलीस कर्मचाऱ्यांची बाजु घेत जलजला टाईमचे संपादक आमेर खान यांच्यावर गुन्हा दाखल न करण्याबाबत दबाव टाकण्याचा प्रयत्न काही लांगुनचालन करणाऱ्या पत्रकारांकडून झाला. मात्र, गुन्हा दाखल करण्यासाठी तालुका पोलीस ठाण्यात दुपारी सव्वा तीन वाजेपासून सायंकाळी ७ वाजेपर्यंत आमेर खान यांच्या समर्थनार्थ उपस्थित असलेल्या पत्रकारांनी नाराजी व्यक्त केली आहे. अशा पत्रकारांनी पत्रकारांची बाजु घेणे गरजेचे असतांना त्यांनी नेमके कोणत्या संबंधातून पोलीस कर्मचाऱ्यांची बाजु घेण्याचा प्रयत्न केला हे सर्वश्रूत आहेच.

## आधुनिक काळात छत्रपती शिवाजी महाराज हेच संघाचे आदर्श - मोहन भागवत

**नागपूर** - पौराणिक काळात हनुमान आणि आधुनिक काळात छत्रपती शिवाजी महाराज हेच संघाचे आदर्श असल्याचं मोठं वक्तव्य सरसंघचालक मोहन भागवत यांनी केलं. तत्वरूप काम करणारा संघ व्यक्तिवाद मानत नाही. पण जीवनात काही साकार आदर्श हवेच असेल तर पौराणिक काळात हनुमान आणि आधुनिक काळात छत्रपती शिवाजी हेच आदर्श आहेत असं ते म्हणाले. ते नागपूरात 'युगंधर शिवराय नियोजन आणि व्यवस्थापनाचे दीपस्तंभ' या पुस्तकाच्या विमोचन प्रसंगी बोलत होते. मोहन भागवत पान २ वर

# विद्यार्थ्यांनी बौद्धिक, शारीरिक क्षमता वाढवून कौशल्य प्राप्त करावे - राज्यपाल हरिभाऊ बागडे

**जालना । प्रतिनिधी** - बौध्दीक क्षमतेसाठी पाठांतर, वाचन आणि लिखाण चांगलेच झाले पाहिजे. नकला करुन काही फायदा होत नसते, तर माणूस हा मुळातच अभ्यासू असायला हवा. केवळ शिक्षण न घेता, कौशल्यपूर्ण शिक्षण ही काळाची गरज झाली आहे. हमखास रोजगार मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी बौद्धिक, शारीरिक क्षमता वाढवून कौशल्य प्राप्त करावे, असे प्रतिपादन राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी केले.

बदनापूर तालुक्यातील आन्वी येथे पंडित दिनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेच्या संत श्री भगवानबाबा आश्रम शाळेच्या वसतिगृह भूमिपूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री पंकजा मुंडे, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, संस्थाध्यक्ष देवेन पटेल, उद्योजक सुनील रायठठ्ठा यांची प्रमुख उपस्थिती होती.

पंडित दिनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेची २८ वर्षापासून ही शाळा अविरतपणे सुरु आहे. आन्वी येथील आश्रम शाळेत परिसरातील मुले शिकत असतात. नवीन वसतिगृहाच्या भूमिपुजनानंतर आता एका वर्षाच्या कालावधीत नवीन वसतिगृहाची इमारत बांधून तयार होईल. संत श्री भगवानबाबांच्या संदेशानूसार जीवन जगत असतांना दुसऱ्यांनाही आपण मदत केली पाहिजे, याच उदात्त हेतूने संस्थेची वाटचाल सुरु आहे. विद्यार्थी दशेत चपळता ही महत्वाची आहे. आता मुलींनी अबला न राहता सबला झाले पाहिजे. मुलींनी पान २ वर



युवा आदर्श

### उकलू...

सत्ता स्थान मिळता
पायदळ लागले हलू
कुठेआता जायचे रे
घोडदळ लागले झुलू
निंदकांच्या मुखातून
स्तुती सुमनेही झेलू
नुकताचं लावलेला
गगनावरी गेला वेलू
साळसूद बुरख्याची
माणसे भलती चालू
संभ्रमित करी चिजा
एका पारड्यात तोलू
उठावदार दिसे जरी
वरून भरजरी शालु
आंत झाकल्या मना
लक्तरे लागली खुलू
अपेक्षा अपराध्यांची
चुकांवर चादर घालू
अ क्षम्य समस्त गुन्हे
प्रमाद पोटामधे घालू
बंदिस्त मने उघडती
रहस्ये लागती उकलू
सावरे स्व जिम्मेदारी
नका एकदुजा ढकलू

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# जे.ई.एस. महाविद्यालयाचा अनागोंदी कारभार उघड - अभाविप

**जालना । प्रतिनिधी** - जे.ई.एस. महाविद्यालयातील बीसीए प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना विना हॉल तिकीट त्यांच्याच महाविद्यालयात परीक्षा द्यावी लागली. परीक्षा झाल्यानंतर हॉल तिकीट आले आणि यामध्ये परीक्षा केंद्र व्ही.एस.एस. महाविद्यालय, जालना हे होते. त्यामुळे या विद्यार्थ्यांचा आणखी देखील निकाल लागलेला नाही. येत्या ८ एप्रिल पासून उन्हाळी सत्राच्या परिक्षांना सुरुवात होणार आहे, २६ मार्च रोजी विद्यापीठाने बीसीए प्रथम वर्षाचा निकाल लावला असून जे.ई.एस. महाविद्यालयाचा निकाल अद्यापही लागला नाही. २९ मार्च ही बॅकलॉगचे फॉर्म भरण्याची शेवटची तारीख होती मात्र निकालच न लागल्याने नापास




झालेले विद्यार्थी बॅकलॉगचा फॉर्म कसा भरतील हा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे विद्यार्थी प्रचंड त्रस्त असून संभ्रम अवस्थेत आहेत.

बीसीएच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातील महाविद्यालय प्रवेश शुल्क २३,८८५/- रुपये पान २ वर

## जिजाऊ रथयात्रेत जनतेने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे- डॉ.तारख

**जालना । प्रतिनिधी** - मराठा जोडो अभियान अंतर्गत मराठा सेवा संघ संचलित जिजाऊ रथयात्रा २०२५ ही महाराष्ट्राचा दौरा करत आहे,ही यात्रा दि. ३ एप्रिल रोजी जालना



जिल्ह्यात दाखल होत असून या रथयात्रेत जनतेने मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे,असे आवाहन संभाजी ब्रिगेडचे महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते डॉ. सुदर्शन तारख यांनी केले आहे.

याबाबत बोलतांना डॉ.तारख म्हणाले की, मराठा सेवा संघ हे गेल्या ३५ वर्षांपासून समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी परिवर्तनवादी, प्रगतशिल आणि सकारात्मक कार्य करीत आहे. समाजाच्या हितासाठी विविध ३३ कक्षांच्या माध्यमातून महाराष्ट्रासह देशपातळीवर कार्यरत असलेल्या मराठा सेवा संघाने अनेक ऐतिहासिक उपक्रम राबवले आहेत. आज आपल्या समाजासमोर मोठी आव्हाने उभी आहेत. जातीयवाद, गुन्हेगारी, भ्रष्टाचार, धार्मिक आणि राजकीय उन्माद यांसारख्या पान २ वर

## नवोदयसाठी नंदापूरचे दोन विद्यार्थी पात्र

**जालना । प्रतिनिधी** - जवाहर नवोदय विद्यालयाच्या प्रवेश परीक्षेचा निकाल नुकताच घोषित करण्यात आला असून या परीक्षेत जालना तालुक्यातील नंदापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने नेहमीप्रमाणे उत्तम कामगिरी करत दोन विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले आहे. या शाळेचे वेदिका चत्रभुज उबाळे आणि आनंद नामदेव खरात हे दोन विद्यार्थी नवोदय साठी पात्र ठरले आहेत. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या इयत्ता ६ च्या प्रवेश




प्रक्रियेसाठी नवोदय विद्यालयामार्फत आयोजित केलेल्या पान २ वर

## महावीर जयंतीनिमित्त कत्तलखाने बंद ठेवण्याची जैन समाजाची मागणी

**जालना । प्रतिनिधी** - अहिंसेचे दूत भगवान महावीर यांच्या जन्मकल्याणक अर्थात जयंतीनिमित्त गुरुवार दि. १० एप्रिल रोजी जालना जिल्ह्यातील सर्व कत्तलखाने एक दिवसासाठी बंद ठेवण्याची मागणी सकल जैन समाजाच्यावतीने जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भगवान महावीर हे अहिंसेचे परम उपासक होते. त्यांचा जियो और जिने दो हा संदेश आजच्या काळातही तितकाच महत्त्वाचा आहे. त्यांच्या जन्मकल्याणक निमित्ताने समाजात अहिंसेचा संदेश पसरवण्यासाठी आणि धार्मिक भावना जपण्यासाठी महावीर जयंतीला पान २ वर



# संपादकीय

## वाहनांवर नियंत्रण!

साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेल्या गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर पुणेकरांनी जोरदार वाहनांची खरेदी केल्याचे समोर आले आहे. गुढीडव्याच्या दिवशी १० हजार १७० वाहनांची खरेदी केली. त्यात ६५१० दुचाकी, २४२४ चारचाकी, ५१७ गुड्स , २८३ रिक्षा, ६८ बस, २३४ टॅक्सी, १३४ अन्य वाहने पुणेकरांनी खरेदी केल्याची नोंद आरटीओत करण्यात आली. मागील वर्षापेक्षा या वर्षी वाहन खरेदीची संख्या तीन हजाराने अधिक आहे. मागच्या वर्षी याच काळात ७३३६ वाहनांची नोंद झाली होती याचाच अर्थ मागील वर्षी पेक्षा यावर्षी अधिक वाहनांची खरेदी पुणेकरांनी केली. आधीच पुणे शहरात वाहनांची संख्या लोकसंख्येपेक्षा अधिक आहे. त्यात या दहा हजार वाहनांची भार पडली आहे. केवळ पुणे शहरातच एका दिवशी दहा हजारांपेक्षा अधिक वाहनांची खरेदी झाली याचाच अर्थ राज्यातील इतर शहरातही वाहनांच्या खरेदीने उच्चांक केला आहे. पुण्यापेक्षा मुंबई, ठाणे या शहरात अधिक वाहनांची खरेदी झाल्याची बाब समोर आली आहे. प्रत्येक शहरात साधारणपणे पाच हजार वाहनांची खरेदी झाल्याचे गृहीत धरले तरी हा आकडा खूप मोठा होतो. पुण्याप्रमाणेच मुंबई शहरातही वाहनांची संख्या अधिक आहे. मुंबईत चार चाकी आणि दुचाकी वाहनांची संख्या ३५ लाखांच्या पुढे गेली आहे. वाढत्या वाहनांमुळे शहरातील रस्ते अपुरे पडू लागली आहेत. शिवाय पार्किंगचीही मोठी समस्या निर्माण झाली आहे. मुंबईत गाड्या पार्क करण्यासाठी जी वाहनतळे आहेत त्यात साधारणपणे दहा हजारांच्या आसपास वाहने पार्क करता येतात. परिणामी रस्त्यांवर अवैध पार्किंगची संख्या वाढली आहे त्याचा फटका शहरातील नागरिकांना बसत आहे. या अवैध पार्किंगवर न्यायालयानेही चिंता व्यक्त केली आहे. वाढत्या वाहनांमुळे मुंबई, पुण्यातील प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे पण याची ना कोणाला फिकीर ना खंत. एकेकाळी पुणे शहर हे सायकलींचे शहर म्हणून ओळखले जायचे ती ओळख आता पुसली गेली आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणाची पातळी कमालीची वाढली आहे. प्रदूषणामुळे दिल्लीची काय अवस्था झाली आहे ते आपण पाहतोच आहे, दिल्ली प्रमाणेच इतर शहरांची अवस्था व्हायला नको असेल तर वाहनांवर नियंत्रण आणायला हवे. नवीन वाहने विकत घेण्यापेक्षा बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर नागरिकांनी करायला हवा पण नागरिकांचा सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर विश्वास नाही. बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नागरिकांना सक्षम सेवा देण्यात अपयशी ठरत आहे. म्हणून जो तो नवीन वाहन घेत आहे. पुण्यामुंबई सारख्या शहरातील वाहनांची संख्या कमी करायची असेल तर बेस्ट, पीएमपीएल सारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेने आपला कारभार सुधारून नागरिकांना योग्य सेवा द्यायला हवी. बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. प्रशासनाने सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम केल्यास पुण्यामुंबईतील वाहनांच्या संख्येवर नियंत्रण येईल यात शंका नाही.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## असलम शेख यांच्या रोजा इफ्तार पार्टीत बंधुत्वाचे उदाहरण




**मुंबई** - अलिफ ओव्हरसीज कन्सल्टंट्सचे संस्थापक आणि सीईओ असलम शेख यांनी रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन केले होते. सर्व जाती आणि धर्माचे लोक बंधुत्वाचे उदाहरण देत रोजा इफ्तार पार्टीला उपस्थित राहण्यासाठी एकत्र आले आणि अस्लम शेख यांच्या या रोजा इफ्तार पार्टीत गंगा-जमुनी संस्कृती दिसून आली. सर्व लोकांनी एकत्र बसून इफ्तार केली आणि विविधतेत एकतेची भावना साकारली, देशात शांती राहावी यासाठी प्रार्थनाही करण्यात आली. या रोजा इफ्तार पार्टीत ते द्या. मुंबई हलचलचे संपादक दिलशाद एस. खान यांच्यासह मोठ्या संख्येने प्रसिद्ध व्यक्ती या कार्यक्रमाला उपस्थित होत्या. अलिफ ओव्हरसीज कन्सल्टंट्सच्या वरिष्ठ व्यवस्थापक शाहिना शेख यांनी रोजा इफ्तार पार्टी कार्यक्रमात सर्वांचे स्वागत केले. इंडो अरब सोसायटीचे सचिव अब्दुल मजीद, जगन्नाथ रेड्डी आणि सीव्ही वेंकट यूएसए इंडिया इम्पोर्टर्स कौन्सिल, बीआयए हितेश शाह उपस्थित आणि येणारे अध्यक्ष, तरण आदर्श बॉलीवूड क्रिकेट चित्रपट विश्लेषक, फिरोजा सुरेश पहिल्या सायकल महापौर मुंबई शालिनी देव विद्यार्थी सल्लागार, हिमांशू देव विद्यार्थी सल्लागार देखील उपस्थित होते. असलम शेख हे अलिफ ओव्हरसीज कन्सल्टंट्सचे संस्थापक आणि सीईओ आणि स्विट्झ एज्युकेशन फाउंडेशनचे अध्यक्ष आणि संस्थापक आहेत. अस्लम शेख हे शिक्षण क्षेत्रातील एक अतिशय प्रसिद्ध चेहरा आहे. असलम शेख यांचे एकच ध्येय आहे की देशातील प्रत्येक मुलाला शिक्षण मिळावे, मग तो श्रीमंत असो वा गरीब, कोणत्याही मुलाला शिक्षणाची चिंता नसावी. जरी एखादा विद्यार्थी फी भरण्यास असमर्थ असला तरी, अस्लम शेख त्यांच्या संस्थेमार्फत त्या विद्यार्थ्याला शिक्षण देतात आणि त्याच्यासाठी भारतात असो वा परदेशात, चांगल्या कंपनीत नोकरीची व्यवस्था करतात, जेणेकरून विद्यार्थी त्याचे/तिचे आणि संपूर्ण कुटुंबाचे जीवन सुधारू शकेल. असलम शेख यांच्या कंपनीने आणि संस्थेने आतापर्यंत स्वित्झर्लंडसह अनेक परदेशी कंपन्यांमध्ये ३२००० हून अधिक विद्यार्थ्यांना यशस्वीरित्या प्लेसमेंट प्रदान केले आहे. कोरोना काळात असलम शेख यांनी अनेक लोकांना मदत केली होती, असलम शेख म्हणतात की लोकांची सेवा करणे हाच मानवधर्म आहे. असलम शेख म्हणाले की, मी विद्यार्थ्यांना सांगू इच्छितो की तुम्ही तुमच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करा, तुमचे कौशल्य सुधारा जेणेकरून तुम्ही देश आणि संपूर्ण जगात तुमचे नाव उज्ज्वल करू शकाल.

# श्रेयाचे श्रेय

पुणे येथील युवा आर्किटेक्ट श्रेया अतुल पोफळे हिला वास्तुकला आणि अंतर्गत रचना : उत्कृष्टतेचा उत्सव या राष्ट्रीय स्पर्धेत सर्वोत्कृष्ट सर्जनशील आणि उदयोन्मुख अंतर्गत रचना आणि प्रकल्प व्यवस्थापन संस्था २०२५,महाराष्ट्र तसेच विश्वासार्ह आणि उदयोन्मुख वास्तुविशारद आणि अंतर्गत रचनाकार २०२५, महाराष्ट्र या प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित झाली आहे. हा पुरस्कार तिला नुकताच बिगीन अप या संस्थेतर्फे बंगलोर येथील ताज वेस्ट एंड या पंचतारांकित हॉटेलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या भव्य
समारंभात नुकताच प्रदान करण्यात आला. वास्तुकला आणि अंतर्गत रचना क्षेत्रातील उत्कृष्टता, नाविन्य आणि सर्जनशीलतेचा सन्मान करणे हा या पुरस्काराचा उद्देश आहे.

विशेष म्हणजे पुरस्कार कुणाला द्यायचा हे , संस्था स्वतःच ठरवीत नाही.तर या क्षेत्रातील तज्ज्ञ आणि मान्यवर व्यक्ति विविध उल्लेखनीय प्रकल्प आणि व्यक्तींना नामांकित करीत असतात. पुढे पुरस्कार निवड समितीच्या वतीने सर्व नामांकने तपासली जाऊन त्यातून अंतिम निवड करण्यात येते.या निवड समितीत नावाजलेले वास्तुविशारद, अंतर्गत रचनाकार असतात. ते नामांकनातील नाविन्य, शाश्वतता, सौंदर्यशास्त्र आणि कार्यक्षमतेच्या निकषांवर मूल्यांकन करून पुरस्कारासाठी अंतिम निवड करतात.अंतिम निवड केलेल्या स्पर्धकांना आपापले सादरीकरण करण्यासाठी आमंत्रित केले जाते. त्यांनी त्यांचे प्रकल्प सादर करत असताना त्यांचे दृष्टीकोन,त्या मागील भूमिका निवड समितीच्या सदस्यांना समजावून सांगावी लागते.

अशी सर्व प्रक्रिया पार पडल्यानंतर श्रेया अतुल पोफळे हिच्या श्रीनिवासम या प्रकल्पाला हा पुरस्कार मिळाला आहे. या प्रकल्पात कमीतकमी साहित्याचा वापर, शाश्वतता, उबदार, रंगसंगती, कार्यक्षम आणि आकर्षक फर्निचर, साधेपणा आणि आधुनिकता यांचे उत्तम मिश्रण आहे.

हा पुरस्कार मिळाल्यानंतर बोलताना श्रेया म्हणाली, हा पुरस्कार मिळणे ही आमच्या टीमसाठी अभिमानाची बाब आहे . वास्तुकला व अंतर्गत रचना क्षेत्रात नवे मापदंड प्रस्थापित करण्याच्या आमच्या वचनबद्धतेचे हे प्रतीक आहे. पुरस्कार देणाऱ्या बिगीन अप या संस्थेचे आणि निवड समितीच्या मान्यवर सदस्यांचे मनःपूर्वक आभार. तसेच आमच्या संपूर्ण टीम, ग्राहक आणि सहकाऱ्यांचेही विशेष आभार कारण त्यांच्यामुळे हे शक्य झाले.

पुरस्कार प्रदान कार्यक्रमात वास्तुशास्त्र रचनाकार , प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी आणि अनेक मान्यवर व्यक्तींची उपस्थिती होती.यामुळे हा सोहळा संस्मरणीय ठरला.

श्रेया च्या या यशाचे विशेष कौतुक




उद्योगातील प्रमुख तज्ज्ञांनी सहभाग घेतला होता. विविध चर्चासत्रे, प्रमुख भाषणे आणि एकमेकांशी संवाद साधण्याची संधी सर्वांना उपलब्ध झाली .

यावेळी श्रेया ने तिच्या प्रेरणा, रचना,तत्त्वज्ञान आणि भविष्यातील योजनांविषयी माहिती दिली.या कार्यक्रमास प्रसिद्ध वास्तुविशारद, यासाठी वाटते की,तिचे सहावी पर्यंतचे शिक्षण येवला येथीलच स्वामी मुक्तानंद विद्यालयात मराठी माध्यमातून झाले. तर सातवी ते दहावी पर्यंतचे शिक्षण त्याच शाळेत सेमी इंग्लिश माध्यमातून तर बारावी पर्यंत चे शिक्षण इंग्लिश माध्यमातून झाले.पुढे आपली आवड ओळखून तिने वास्तुशास्त्र ही शाखा निवडली. रीतसर प्रवेश परीक्षा देऊन तिने पुणे येथील मराठवाडा मित्र मंडळाच्या वास्तुशास्त्र महाविद्यालयात प्रवेश मिळविला. पाच वर्षांचा हा अभ्यासक्रम करून नोकरीच्या मागे न लागता,एकीकडे तिने एम आय टी संस्थेत वास्तुशास्त्रातील मास्टर्स अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला. तर सहा महिन्यांच्या इंटर्नशिप च्या अनुभवाच्या आधारावर थेट स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचे धाडस दाखविले आणि एलेगंझा स्टुडिओ ही स्वतःची फर्म सुरू केली.ही फर्म वाणिज्य आणि निवासी स्वरुपाचे प्रकल्प हाती घेत असते.या फर्म ने आता पर्यंत पुणे, सातारा, नाशिक, येवला, नांदेड येथील प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण केले आहेत.या बरोबरच फर्म मॉड्युलर किचन, कस्टम मेड सोफा अशी उत्पादने बनविण्यात सक्रिय आहे. आज श्रेया कडे २ पूर्ण वेळ आर्किटेक्ट, ५ इंटर्न्स तर कारखान्यात जवळपास ५० कामगार काम करीत आहेत. त्यामुळे एलीगंजा स्टुडिओ हा श्रेया च्या व्यावसायिक प्रवासातील हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. श्रेयाचे हार्दिक अभिनंदन आणि उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा!

**देवेंद्र भुजबळ**
**९८६९४८४८००**

# मुद्देसूद पण, निराशाजनक भाषण

मनसे कार्यकर्ता मेळाव्या नंतर येत्या गुढी पाडव्याला माझी स्पष्ट भूमिका मांडेन असे सांगून राज ठाकरे यांनी मनसैनिक,राजकीय नेते आणि महाराष्ट्रातील जनतेची उत्सुकता शिगेला पोहोचवली.पाडवा आणि दसरा मेळावा हा मराठी माणसासाठी संदेश देणारा असल्यामुळे बाळासाहेबांच्या विचारांचे सोने लुटण्यासाठी शिवतीर्थावर अलोट गर्दी उसळते.बाळासाहेबांनंतर काही काळ राज ठाकरे यांनी ती परंपरा पुढे नेत असताना वैचारिक धरसोड वृत्तींमुळे ओहोटी लागण्याची शक्यता निर्माण झाली. .

अपेक्षेप्रमाणे मैदान भरते परंतु विचारांचे सोने व एक ठोस कार्यक्रम,दणदणीत आदेश मिळेल असे वाटले होते पण भ्रम निरास करण्याचे कार्य राज ठाकरे यांनी केले.भाषणात मुद्दे चांगले मांडले परंतु त्यात आक्रमकता नव्हती मनाचा ठाव घेणारी नव्हते.कोणताही खणखणीत दणदणीत आदेश नव्हता.

मनसेचा पूर्वीची मराठी माणसाच्या हक्कासाठी जी दहशद व दबदबा होता तो आज लोप पावण्याच्या मार्गावर आहे.कारण महायुतीचे सरकार आल्यापासून मराठी बोलण्यापासून अन्य ज्वलंत प्रश्नावर मनसे सैनिक आक्रमक होत होते तरी त्याला परप्रांतीयांनी वाटाण्याच्या अक्षता लावत प्रकार कमी होण्याऐवजी वाढतच चालला आहे.हे आपल्याला प्रसारमाध्यमातृन पाहायला मिळते. आमच्या महाराष्ट्रात मराठी माणसांनी ताटात काय खायचे हे फक्त आम्हीच ठरवणार असा मजकूर असलेला फलक आम्ही गिरगावकर ह्यांनी लावून एक प्रकारे परभाषिकांना इशारा दिला तो योग्यच आहे.मराठी माणसांनी आक्रमक होऊन एकमेकाला साथ देत परभाषकांना ठेचून काढण्यात सुरुवात करणे हि मराठी महाराष्ट्राची गरज आहे.मनसैनिक आक्रमक होताना उठाबशा काढायला लावतात,दमबाजी करतात कानफटात मारतात,राज ठाकरे यांनी त्यांच्या भाषणात तेच सांगितले त्यात विशेष काय आहे ? वास्तविक माजलेल्या परप्रांतीयांना मराठीची ऍलर्जी असेल तर त्यांना दंडेलशाहीने त्यांच्या राज्यात पाठवण्याची मोहीम हाती घेतली पाहिजे. देवेंद्र फडणवीस ह्यांच्याकडे मराठी माणसांना सांभाळून घ्या ह्याची मागणी करण्याची गरज काय ? राज ठाकरेंनी स्वतःची हिम्मत गहाण टाकली आहे काय ? मनसैनिकांना ऊर्जा देण्याऐवजी त्यांचे मानसिक खच्चीकरण करत आहेत असेच म्हणावे लागेल.



राज ठाकरे यांच्या चांगुलपणाचा फायदा व मनसेची राजकीय ताकद कमी करण्याच्या प्रयोगात भाजपचे वरिष्ठ नेते त्यांना सतत भेटून यशस्वी झाले हे सत्य नाकारून चालणार नाही. मनसे हा पक्ष मराठी माणसांच्या आशेचा किरण मंद होऊ नये असे वाटत असेल तर राज ठाकरे यांनी पूर्वीसारखे आक्रमक निर्णय घेणे, हि काळाची गरज आहे. अन्यथा मनसे पक्ष गयी भैस पानीमें अशी अवस्था होऊ शकेल.

**यशवंत चव्हाण**
**सीबीडी, बेलापूर.**

पान १ वरुन

## विद्यार्थ्यांनी बौद्धीक ...

आजच्या काळात शारीरिक व बौध्दीक क्षमता वाढवावी. पाठ्यपुस्तक व्यतिरिक्त अवांतर पुस्तके वाचुन ज्ञानाचा साठा वाढवावा. तसेच शिक्षकांनीही मुलांना ज्ञानदानाचे काम सुयोग्य करावे. असेही त्यांनी यावेळी सांगितले.

**मराठी शाळेतुनच संस्कारक्षम माणसे निपजली जातात - पालकमंत्री पंकजा मुंडे**

शिक्षक हे आपल्या जीवनात ज्ञानदानाचे पवित्र कार्य करत असतात. गुरु कधीही मुलांवर वाईट संस्कार करत नसतात. योग्य ती वाट दाखविण्याचे कार्य हे गुरुवर असते. तर दाखविलेल्या योग्य वाटेवर चालण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची असते. आणि स्वतःच्या मनावर ताबा ठेवत, जो संस्कार गृहण करतो तोच जीवनात यशस्वी होत असतो. तरी मराठी शाळेतूनच संस्कारक्षम माणसे निपजली जातात, असे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे यांनी केले.

पालकमंत्री श्रीमती मुंडे म्हणाल्या की, मराठी शाळेत संस्कारक्षम पिढी घडवण्याची सक्षमता आहे. जिल्हाधिकारी, शासकीय अधिकारी, मंत्री पदापर्यंत झेप घेतलेल्या व्यक्तींचे शिक्षण हे मराठी शाळेमधूनच झाल्याचे आपल्याला दिसून येईल. संघर्षामधूनच इतिहास घडत असतो, त्यामुळे शॉर्टकट वापरुन पुढे जाण्याचा विचारसुध्दा मनात येवू देवू नका. मैदानी खेळ खेळा, शिक्षण घ्या आणि आपले जीवन यशस्वी करा असेही त्यांनी सांगितले. आज गावच्या गावे मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा लाभ घेत आहेत, या माध्यमातून महिलांना आर्थिक बळ देण्याचे काम शासनाने केले आहे. या कार्यक्रमास ग्रामस्थ, पदाधिकारी, शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जेईएस महाविद्यालयाचा ...

एवढे कळविण्यात आले, मात्र पहिले सत्र झाल्यानंतर हे शुल्क २७,२८५/- आहे असे सांगण्यात आले. त्याचे कुठल्याही प्रकारचे स्पष्टीकरण महाविद्यालय प्रशासनाने दिले नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे; जर महाविद्यालयाचे प्रवेश शुल्क वाढले असेल, तर याची पूर्व सूचना शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच द्यायला हवी होती. विद्यापीठातून माहिती घेतली असता जून २०२३ मध्ये व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून महाविद्यालय प्रवेश शुल्क वाढवण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे कळले. मात्र महाविद्यालयाला ही माहिती नोव्हेंबर २०२४ मध्ये कळाली असे महाविद्यालयाने स्पष्टीकरण दिले. यामुळे महाविद्यालय प्रशासन किती सजग आणि दक्ष आहे हे लक्षात येते.

अभाविप देवगिरी प्रदेश मंत्री कु. वैभवी ढिवरे म्हणाल्या की, जे.ई.एस. महाविद्यालयात व्यवस्थेचे बारा वाजले असून प्रशासनाची खिळखिळी अवस्था झालेले दिसून येत आहे. जर महाविद्यालय प्रशासन अशा पद्धतीने हलगर्जीपणा करत असेल, तर येणाऱ्या काळात अभाविप तीव्र स्वरूपाचे आंदोलन करेल, असा इशारा देखील नवनाथ गव्हाणे यांनी दिला.

अभाविप जालना शहर मंत्री गणेश बोंडे म्हणाले की, विद्यार्थी परिषदेने जे.ई.एस. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या निकाल, महाविद्यालय शुल्क वाढ आणि अशा विविध समस्यांना घेऊन निवेदन दिले, मात्र महाविद्यालयाने कुठली ही कारवाई केली नाही, म्हणून विद्यार्थ्यांच्या या प्रमुख समस्यांना घेऊन आंदोलन केले असून महाविद्यालयाने विद्यार्थी हिताचा निर्णय घ्यावा अशी प्राचार्यांकडे मागणी केली आहे.

या सर्व विषयांना घेऊन अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने विद्यार्थ्यांना घेऊन महाविद्यालयाच्या मुख्य इमारती समोर आंदोलन केले. यावेळी अभाविप देवगिरी प्रदेश मंत्री कु. वैभवी ढिवरे, जालना जिल्हा संयोजक नवनाथ गव्हाणे, शहर मंत्री गणेश बोंडे व विद्यार्थी उपस्थित होते.

## जिजाऊ रथयात्रेत ....

अनेक कारणांनी सामाजिक एकता धोक्यात आली आहे. धार्मिक सलोखा दुभंगला आहे आणि समाजाची मजबूत विण विस्कटत चालली आहे. समाजा- समाजात संशयाचे तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. यामुळे समाजमन अस्वस्थ, संशयग्रस्त आणि असुरक्षित वाटत आहे. त्याचा थेट परिणाम आपल्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक व्यवस्थेवर होत आहे.

ही परिस्थिती बदलण्यासाठी युवक-युवती, विद्यार्थी, शेतकरी, प्रौढ महिला-पुरुष यांच्याशी संवाद साधण्यासाठी, समाजाला एकसंघ करण्यासाठी आणि राष्ट्र उभारणीच्या कार्यात बंधुभाव जपत आपल्या ऐक्यांचा जागर घालण्यासाठी मराठा सेवा संघाच्या माध्यमातून जिजाऊ रथयात्रा २०२५ अंतर्गत मराठा जोडो अभियान आयोजित करण्यात आलेले आहे.संविधान, कायदा आणि हक्क याबद्दल जनजागृती नागरिक म्हणून आपली जबाबदारी आणि कर्तव्ये समजावून सांगणे. सामाजिक एकता आणि एकात्मता समाजात सलोखा आणि ऐक्य राखण्याचे महत्त्व, जातीय तेढ आणि सामाजिक दुभंग यावर प्रबोधन. महिला सक्षमीकरण, महिलांसाठी असलेल्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक संधींबाबत चर्चा. महिला सक्षमीकरण आणि सुरक्षितता यावर विशेष भर. शासकीय योजना आणि लाभशासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती व त्याचा समाजातील प्रत्येक घटकाने कसा लाभ घ्यावा, याबाबत मार्गदर्शन. जनजागृती, समाजातील प्रत्येक व्यक्तीने जबाबदारीने कायद्याचे पालन करणे, सुशासनासाठी सजग नागरिक होणे. सामाजिक विण पुन्हा मजबूत करण्यासाठी कुटुंबसंस्था, संस्कार आणि परंपरांचा सन्मान मराठ्यांच्या उज्वल परंपरेचे स्मरण करून सामाजिक बांधिलकी दृढ करणे, जिजाऊ रथ यात्रा ही सर्व समाजासाठी आहे. ही जिजाऊ रथयात्रा जालना जिल्ह्यात दिनांक ३ एप्रिल रोजी दाखल होत आहे, सकाळी१० वाजता जालना येथील मराठा सेवा संघाच्या कार्यालयात बैठक, यानंतर अंबड येथे बैठक, दुपारी घनसावंगी येथे सभा व सायंकाळी परतूर येथे सभा होवून रथयात्रेचा मुक्काम राहणार आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीने यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही डॉ. तारख यांनी केले.

## नवोदयसाठी नंदापूरचे ...

परीक्षेचा निकाल दि. २५ मार्च रोजी जाहीर झाला असून यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंदापूर विदयार्थ्यांनी चमकदार कामगिरी करत यश मिळविले. या विद्यालयाचे दोन विद्यार्थ्यांनी यश मिळवले. या यशाबद्दल यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. दरम्यान, नंदापूर सारख्या गावात शिक्षण घेऊन उज्वल यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर सरपंच दत्तु कुरधने, शालेय समिती अध्यक्ष मनोज चांदगुडे, मुख्याध्यापक सुरेश बागुल, शिक्षकवृंद सौ. घोंगे, सौ. अंभुरे, सौ. गायकवाड, सौ. फराटे, श्री जोशी, श्री कुरकुटे, श्री सदावर्ते यांच्यासह संपूर्ण गावातून विद्यार्थ्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. शिवाय शाळेने यशाची परंपरा कायम ठेवत आंबा येथे आपले स्थान कायम ठवले आहे.

## महावीर जयंतीनिमित्त ...

जिल्ह्यातील संपूर्ण कत्तलखाने बंद ठेवावेत, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

निवेदन देताना संजय लव्हाडे, विजयकुमार जैन, महावीर रुणवाल, दिपक मोदी, श्रीपाल मरलेचा, रोशन रुणवाल, प्रवीण पहाड़े, ड. अनिल संचेती, रविन्द्र संचेती, राजेश लुनिया, महावीर कटारिया, चैतन्य वायकोस, चेतन बोथरा, पंडित खुळे, पंकज जैन, अजय बोरा, नरेंद्र जोगड, प्रेमचंद कासलीवाल, विजयराज सुराणा, विजय बावीशी, जय कोटेचा, कुशल गेलड़ा, चेतन देसरडा, वीरेंद्र अलिझार, पवनराज सुराणा, संदीप गवळी, विजय लोनगोरे, संतोष ओस्तवाल, कांतिलाल सेठिया आदी समाज बांधवांची उपस्थिती होती.

## आधुनिक काळात ...

म्हणाले की, शिवाजी महाराजांनी भरीव काम करून ठेवलं आहे. त्यामुळेच डॉ. हेडगेवार, गोळवलकर गुरुजी आणि बाळासाहेब देवरस या संघाच्या पहिल्या तीनही सरसंघचालकांनी वेगवेगळ्या काळात हे सांगून ठेवले आहे की संघाचे काम जरी तत्वरूपी असले आणि संघ व्यक्तिवाद मानत नसला, तरी काही साकार आदर्श लागतातच. त्यासाठी पौराणिक काळात हनुमान आणि आधुनिक काळात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवाय दुसरे आदर्श नाहीत.

आज अडीचशे वर्षानंतरही शिवाजी महाराज हेच प्रेरणा आणि आदर्श आहेत असे मोहन भागवत म्हणाले. सिकंदरपासून देशात एकानंतर एक परकीय आक्रमण होत असताना आणि इस्लामिक आक्रमणात सर्व काही उद्ध्वस्त होईल अशी स्थिती असताना शिवाजी महाराजांनी उपाय दिला. शिवाजी महाराज आग्र्यातून सुखरूप परत येतील की नाही अशी सर्वांना शंका असताना, महाराज परत आले. राज्य पुन्हा बळकट केलं आणि त्यानंतरच भारतात परकीय सत्तेची सद्दी संपली आणि बुंदेलखंड, राजस्थान, मुघलांपासून मुक्त झाले असे मोहन भागवत म्हणाले.

भारताच्या सतत पराजयाचे युग बदलले, शिवाजी महाराजांनी ते बदलले आणि ही स्थिती पुढेही कायम राहावी यासाठी जे काही करावे लागत होते ते सर्व शिवाजी महाराजांनी करून ठेवले होते. म्हणूनच शिवाजी महाराज तेव्हापासून आजपर्यंत आपले आदर्श आहेत असे मोहन भागवत म्हणाले.

## टेंभुर्णीतील राम जन्मोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह

### ४७ वर्षाची परंपरा

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी** - श्री राम जन्मोत्सवाच्या निमित्ताने येथील श्रीराम मंदिरामध्ये सोमवारापासून अखंड हरिनाम सप्ताहाला प्रारंभ झाला. मागील ४७ वर्षापासून या ठिकाणी श्रीराम जन्मोत्सवाचे निमित्त साधून अखंड हरिनाम सप्ताह विष्णुसहस्रनाम हरिपाठ व हरिकीर्तनाचा कार्यक्रमाचे आयोजन केल्या जाते. यानिमित्ताने शिवमहापुराण प्रवक्त्या साक्षीताई अपार, राधिका चौधरी गोडवडकर, विठ्ठल महाराज जगताप निवडुंगा कर अंजलीताई पंडित रेहाडकर भगवान महाराज गाडेकर सुशांत महाराज पवार रामेश्वर महाराज पवार मंगेश महाराज हिवरेकर व निवृत्ती महाराज कोरडे यांचे हरिकीर्तन होणार आहेत रविवारी श्रीराम जन्मोत्सवाच्या निमित्ताने सकाळी नऊ ते अकरा श्री राम जन्माचे किर्तन होणार आहे, त्यानंतर गावातून श्री राम प्रभूची पालखी मिरवणूक काढली जाणार आहे तसेच महिलांकडून राम मंदिरामध्ये दीपोत्सवाच्या कार्यक्रमाचे हे आयोजन केले आहे. तर ७ एप्रिल रोजी अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता होणार आहे या निमित्ताने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे या सोहळ्यामध्ये परिसरातील भजनी मंडळासह गावातील भजनी मंडळांचा समावेश आहे श्रीराम मंदिर परिसरात होणाऱ्या या सोहळ्याचा भाविकांनी लाभ घ्यावा असावा आयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

**मंदिरातील राम-लक्ष्मण सीतेच्या आकर्षक मूर्ती वेधतात लक्ष**







# जैन संघटनेच्या गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार उपक्रमास सर्वतोपरी सहकार्य करू- डॉ. पांचाळ

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जैन संघटना आणि महाराष्ट्र राज्य सरकारच्या मृद व जलसंधारण विभागाच्या संयुक्त करारानुसार शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढवण्यासाठी गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार तसेच नाला खोलीकरण व रुंदीकरण या दोन महत्त्वपूर्ण योजनांना कायमस्वरूपी मंजुरी देण्यात आली आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांना जलस्रोतांचे संवर्धन करता येणार असून, शेतजमिनींची सुपिकता वाढण्यास मदत होणार असल्याने या उपक्रमास जिल्हा प्रशासनाचे सर्वतोपरी सहकार्य राहील, अशी ग्वाही जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली.

भारतीय जैन संघटनेचे संस्थापक शांतीलाल मुथा, राष्ट्रीय अध्यक्ष नंदकिशोर साकला, राष्ट्रीय सचिव दीपक चोपडा, प्रदेश अध्यक्ष केतन शाह, प्रदेश सचिव प्रवीण पारख यांच्या मार्गदर्शनाखाली जालना जिल्ह्यात या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होणार आहे. त्या अनुषंगाने भारतीय जैन संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजयकुमार जैन यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने बुधवार दि. २ एप्रिल जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांची भेट घेतली. याप्रसंगी झालेल्या बैठकीत या योजनांबाबत सविस्तर माहिति देण्यात आली. प्रास्ताविकात रोशन रुणवाल यांनी गाळ म्हणजे काय आणि गाळ काढण्याचे नियोजन कसे करावे, यावर प्रकाश टाकला. तसेच जलजिल्हा प्रमुख दीपक मोदी यांनी योजनेच्या अंमलबजावणीची सविस्तर माहिती दिली. गाळ काढण्यासाठी अर्ज कसा भरावा, ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया कशी करावी याचेही मार्गदर्शन त्यांनी केले.

जिल्हाध्यक्ष विजयकुमार जैन यांनी ग्रामपंचायतींनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी पुढाकार घेण्याची घेण्याचे आवाहन केले. भारतीय जैन संघटना महाराष्ट्रभर या योजनेचा प्रचार व प्रसार करून शेतकऱ्यांमध्ये जागरूकता निर्माण करेल. या कार्यात स्थानिक प्रशासन, ग्राम



पंचायती, सरपंच, ग्रामसेवक आणि शेतकऱ्यांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गाळयुक्त शिवारामुळे शेतजमिनी अधिक सुपीक होणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी या उपक्रमाला प्रशासनाच्यावतीने संपूर्ण सहकार्य देण्याचे आश्वासन दिले. जलसंधारण आणि मृदसंवर्धनाच्या या योजनांमुळे कृषी क्षेत्राला मोठा फायदा होईल, असेही त्यांनी सांगितले.

जैन संघटनेच्या शिष्टमंडळात विजयराज सुराणा, श्रीपाल मरलेचा, राजेश लुनिया, ड. अनिल संचेती, रविंद्र संचेती, पवनराज सुराणा, संजय लव्हाडे, महावीर रुणवाल, संतोष ओस्तवाल, प्रवीण पहाडे, महावीर कटारिया, चैतन्य वायकोस, पंडित खुळे, पंकज जैन, कांतिलाल सेठिया, अजय बोरा, नरेंद्र जोगड, प्रेमचंद कासलीवाल, विजय बावीशी, जय कोटेचा, कुशल गेलडा, चेतन देसरडा, वीरेंद्र अलिझार, जिल्हा समन्वयक संदीप गावली, विजय लोनगोरे आदी मान्यवरांचा समावेश होता. या महत्त्वपूर्ण योजनांच्या अंमलबजावणीमुळे जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांना जलस्रोतांचे संरक्षण आणि मृदसंधारणाचा लाभ होईल, असा विश्वास या वेळी व्यक्त करण्यात आला.

महानगरपालिकेची कोट्यावधीची जागा गिळंकृत करण्याचा डाव

# वक्फ बोर्डाच्या जागेच्या नियंत्रणासाठी नवीन विधेयक मात्र स्वतःच्या जागेच काय?

## जांबुवंत मनोहर यांचा सवाल




**पुणे । प्रतिनिधी -** पुणे महानगरपालिका हद्दीतील विंडसर अवेन्यू कॉन्डोमिनियम, स. नं. ६०, वानवडी पुणे - ४११०४० या सोसायटीने साधारण ४०,००० चौ.फू. क्षेत्रफळाच्या, बाजारभावानुसार अंदाजे रू ३५ ते रू ४० कोटी रुपये किमतीची महानगरपालिकेच्या मालकीची जमीन बळकावून कब्जा केल्याचा आरोप समाजवादी पक्षाचे पुणे शहर अध्यक्ष जांबुवंत सागरबाई मनोहर यांनी पत्रकार परिषदेत केला. यावेळी दत्ता पाकीरे (पुणे शहर व जिल्हा सरचिटणीस), अनिरुद्ध सुर्यवंशी ( उपाध्यक्ष पुणे शहर ), साधना शिंदे (जिल्हा महिला अध्यक्ष), शहाजहान झारी (चिटणीस पुणे शहर) आदी उपस्थित होते.

जांबुवंत मनोहर म्हणले, एकीकडे सरकार वक्फ बोर्डाच्या जागेवर नियंत्रण ठेवण्यासाठी नवीन विधेयक आणण्याची तयारीत आहे; परंतु स्वतःच्याच जागेवर कोणी कब्जा मारते याकडे मात्र लक्ष दिले जात नाही. पुणे शहरातील अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी महापालिका प्रशासन पोलिसांसमवेत संयुक्त कारवाई केली जाणार असल्याचे आदेश असताना देखील पुणे महानगरपालिका स्वतःच्याच जमिनीवरील अतिक्रम का काढू शकत नाही ? समाजवादी पक्षातर्फे निवेदन देऊन सुद्धा कारवाई होत नसेल तर सोसायटी सोबत पुणे महानगरपालिकेची मिली भगत तर नाही ना..? असा संशय आम्हा कार्यकर्त्यांना येत आहे.

सदर सोसायटीला पुणे महानगरपालिका कडून जा. क्र. ०५/ ३४६१ दिनांक ०४ /०९ / २०२४ आणि जा. क्र. ०५/ ३८७० दिनांक २५ / ०९ / २०२४ रोजी अशा दोन नोटीसा जागा मोकळी करणेबाबत देण्यात आल्या असून देखील सोसायटीने अद्याप अतिक्रमण हटवले नाही. आणि पुणे महानगरपालिका प्रशासनाला सुद्धा कष्ट घ्यावेसे वाटले नाही म्हणून समाजवादी पक्षाला हे कष्ट घ्यावे लागत आहे असे देखील जांबुवंत म्हणले.

**सदर जागेवर सोसायटीने नेमकं काय केलं**

पुणे महानगरपालिकेच्या मालकीची जमीन बळकावून येथे अनधिकृत पेड पार्किंगचा व्यवसाय सुरू करण्यात आला आहे. उर्वरित जागेत गार्डन तयार केले मात्र तेथे लहान मुलांना खेळण्यासाठी अथवा ज्येष्ठांना विरंगुळा व्हावा यासाठी परवानगी नसून काही ठराविक लोकांच्या पार्ट्या आणि अय्याशीसाठी वापर केला जात आहे. गेल्या १५ वर्षांपासून हा व्यवसाय चालू असताना देखील महानगरपालिका कारवाई का करत नाही...? जर येत्या दोन दिवसात कारवाई झाली नाही तर सदर जागेवर समाजवादी पक्षातर्फे तीव्र आंदोलन करू असा इशारा देखील त्यांनी यावेळी दिला.

# शहरातील शास्त्रीनगर, युसुफ कालनी मध्ये घाणीचे साम्राज्य

## नागरीकांच्या घरामध्ये नाल्यांचे घाण पाणी, आरोग्य धोक्यात



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील शास्त्रीनगर, युसूफ कॉलनी मध्ये रेणुकादेवी मंदिराच्या बाजूला अत्यंत घाण कचरा झाल्याने नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत आहे. पालिका प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना वारंवार सूचना देऊनही स्वच्छता अधिकारी किंवा कर्मचारी येत नसल्याने नागरिक या घाणकाचऱ्या मुळे त्रस्त झाले आहेत. मेलेले जनावरे या ठिकाणी पडून असल्यामुळे परिसरामध्ये अत्यंत दुर्गंधी पसरली आहे. रेणुका देवी मंदिर ची पडझड झाली असून संबंधित विभागाने डागडूजी करून कंपाउंड वॉल बांधून देण्याचे मागणी स्थानिक नागरिकांच्या वतीने होत आहे. तसेच ड्रेनेज लाईन पूर्णपणे चोकअप झाल्यामुळे अक्षरशः नागरीकांच्या घरामध्ये नाल्यांचे घाण पाणी शिरत आहे. घाण पाण्यामुळे डास,मच्छर वाढले असून हिवताप, मलेरिया, डेंगू सारख्या आजार बळवण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तसेच रोडवर सुध्दा घाण पाणी वाहत आहे.त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे.

आज दिनांक ०१ मंगळवार रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास स्थानिक नागरिकांनी माध्यमांशी संवाद साधून आपल्या समस्यांचा पाढा वाचला. शहरातील युसुफ कॉलनी शास्त्री महल्ला येथे महानगरपालिका च्या दुर्लक्षामुळे व रेणुका देवी मंदिर परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे मंदिरात येणाऱ्या भाविकांना या दुर्गंधीचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. शहरातील जागरूक देवस्थान म्हणून रेणुका देवीचे मंदिर ओळखले जाते. या मंदिरात शहरातील भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी येत असतात. मात्र मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात घाण पसरली असल्याने भाविकांना दर्शनासाठी येत असताना प्रचंड दुर्गंधी येत आहे. परिणामी भाविकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. यामुळे रेणुका देवी मंदिर परिसरातील दुर्गंधी जिल्हा प्रशासनाने व नगरपालिका प्रशासनाने तातडीने साफ करावी आणि रेणुका देवी मंदिर परिसर भाविकांसाठी स्वच्छ करून द्यावा अशी मागणी आता नागरिकांकडून होत आहे.

यावेळी शेख महेमुद मोमीन,अबदुल वसीम जब्बार, शेख मननान,नुर मोहम्मद,अता मोहम्मद बक्षी, साद बिन मुबारक कमाल सर, शेख सुभान, मौलाना हककानी साहेब,जावेद सर,जफर शेख,रबबानी सर, यांच्यासह परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# वक्फ बोर्डवरून विरोधक गैरसमज पसरावताहेत - शाह

**नवी दिल्ली -** वक्फ बोर्डवरून विरोधक लोकांमध्ये गैरसमज परसवत असून त्यांच्या मतपेढीसाठी अल्पसंख्यांक समाजाला भीती दाखवत असल्याचा आरोप केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केला. नव्या वक्फ बोर्ड कायद्यानुसार, कोणताही गैर मुस्लिम व्यक्ती याचा सदस्य नसेल. देणगीसाठी देण्यात आलेल्या निधीचा वापर योग्य पद्धतीने होतोय का नाही हे पाहणे वक्फ बोर्डचे काम असेल. त्यामध्ये इस्लामी धर्माच्या श्रद्धेमध्ये कोणताही हस्तक्षेप करण्याची सरकारची इच्छा नसल्याचं अमित शाहांनी स्पष्ट केलं.

# श्रीमती जे.बी.के विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील नवभारत शिक्षण संस्थेच्या श्रीमती.जे. बी.के विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नुकत्याच जाहीर झालेल्या आर्थिक दृष्ट्या दूर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत (एन.एम.एस.एस.)घवघवीत यश संपादित केले आहे. २२ डिसेंबर २०२४ रोजी, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा आयोजित करण्यात आली होती.श्रीमती.जे. बी. के विद्यालयातील ५४ विद्यार्थी या परीक्षेला प्रविष्ट झाले होते, या परीक्षेत विद्यालयाचा १००% निकाल लागला असून, ३७ विद्यार्थी पात्रता धारक झाले आहे .तर ७ विद्यार्थी सारथी शिष्यवृत्ती साठी पात्र ठरले आहेत.या विद्यार्थ्यांना इ.आठवी ते बारावी पर्यंतचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत प्रत्येक वर्षी १२०००,रू.प्रमाणे ६०,०००रु.



शिष्यवृती मिळणार आहे. श्रीमती.जे.बी.के. विद्यालयात शिष्यवृत्ती परीक्षेसाठी प्राचार्य. नंदकुमार काळे व उपमुख्याध्यापक पंजाबराव सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली परिक्षा समन्वयक. धनंजय पुराणे,विष्णू जाधव, संजय कुलकर्णी,भिवसन ससाणे, उज्वला आवटी एफ.ए.शेख, ज्योतीताई जाधव, यांनी परीक्षा पूर्व तयारी करून घेतली, तसेच या विद्यार्थ्यांना पंजाबराव दांदडे, नारायण पिंपळे, एस.बी.बोरकर, गणेश सावसक्के आदींचे मार्गदर्शन लाभले, या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्था अध्यक्ष. संजय काबरा, उपाध्यक्ष.जमिर अमिर शेख सर ,सचिव. सत्यनारायण सोनी, कोषाध्यक्ष सुभाष राठी, ज्येष्ठ संचालक रामनारायण काबरा, ज्येष्ठ संचालक तथा माजी अध्यक्ष सुरेश शेठ काबरा, ज्येष्ठ संचालक तथा माजी सचिव प्रेम सुख काबरा, संचालक तथा माजी सचिव प्रल्हाद टेंभुर्णीकर, संचालक राजू काबरा, संचालक दीपक काबरा, संचालक. मधुकरराव निकम, , संचालक. विष्णू सांगुळे, , संचालकतथा उपप्राचार्य प्रा. दत्ताजीराव देशमुख, संचालक प्रदीप मुळे ,संचालक प्रदीप काबरा , रमेश इंगळे, कैलास भूतेकर, समाधान कांबळे, डी .डी.उखर्डे. दत्ता उखर्डे,राजेंद्र जगताप, राजेश शेवाळे,प्रा. सुनील बनसोडे प्रा.डॉ. अरुण आहेर, प्रा.रामदास भांगे, प्रा.गजानन धोटे, प्रा.के.जी.जाधव,प्रा. डॉ.आनंद जाधव,रवींद्र मोरे, वासुदेव क्षिरसागर , राजुभाऊ डोमळे, नागोराव देशमुख, दगडुबा तांबेकर, दिपक देशमुख, आदींनी अभिनंदन केले आहे.




**महामानव घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त आनंदनगर व आदर्श नगर यांच्यावतीने स्वर आदर्श संगीत रजनीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी माजी आमदार कैलास गोरंट्याल, सुदामराव सदाशिवे, रिपाई नेते ब्रह्मानंद चव्हाण, अनिल व्यवहारे, निखिल पगारे, अशोक नावकर, आयोजक चंद्रकांत साळवे, अशोक पंडित आदी.**

# जालन्यात सुनेने केली सासूची हत्या

## हत्येनंतर मृतदेह गोणीत टाकून सून फरार; पोलीसांनी परभणी येथून घेतले ताब्यात

**जालना । प्रतिनिधी -** सुनेनं सासूची हत्या करून मृतदेह एका गोणीत भरल्याची धक्कादायक घटना घडलीये.. सविता संजय शिनगारे असं ४५ वर्षीय मयत महिलेचं नाव असून शहरातील भोकरदन नाका परिसरातील प्रियदर्शनी कॉलनीतील ही घटना आहे.. सुनेने भिंतीवर डोकं आपटून सासूची हत्या करण्यात आल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. गोणीत भरलेला मृतदेह उचलता आला नसल्यानं तिथेच मृतदेह सोडून सून फरार झाली होती. घरमालकाच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी याची माहिति पोलिसांना दिली. घटनेची माहिति मिळताच पोलीस आधीक्षक अजय कुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव व त्यांचे पथक सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भारती, कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सिद्धार्थ माने आपल्या फौजफाट्या सह घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर पोलिसांनी घटनेचा पचंनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवला.

दरम्यान पोलीसांनी आरोपी सुनेचा शोध घेण्यासाठी वेगवेगळ्या दिशेने पथक रवाना केले असता परभणी येथून पोलीसांनी आरोपी सुनेला ताब्यात घेतले.प्रतिक्षा शिंगारे हिचा पती लातूर येथे नौकरी करत आसून जालन्यातील घरी सासू आणि सून ह्या दोघीच राहत आसल्याची माहीती पोलीसांच्या वतीने मिळाली. आरोपी सुनेला ताब्यात घेण्यात आले असून पोलीस तपासात खूनाचे नेमके कारण काय होते हे निष्पन्न होईल.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.